विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३९ वा | शुक्रवार, दि. ०१ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आजपासून राज्यात जनगणना सुरु होणार

## नागरिक घरच्या घरी ऑनलाइन स्व-गणना करु शकणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १ मे पासून राज्यात जनगणना सुरू होणार आहे. यंदा पहिल्यांदाच स्व-गणना अशी नवीन प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यासाठी स्व-गणना पोर्टल 1 मे ते 15 मे पर्यंत कार्यरत होणार आहे. अवघ्या 15 ते 20 मिनिटात स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करण्यात येता येणार आहे. या स्व-गणनेदरम्यान कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याची आवशक्यता नाही. राज्याच्या जनगणना कार्य संचालनालयच्या संचालक निरुपमा डांगे यांनी याबाबत माहिती दिली आहे. राज्यातील नागरिकांना se.census.gov.in या संकेतस्थळावर जावून स्वतःची माहिती ऑनलाइन भरता येईल.

यंदाची १६ वी जनगणना आहे. दोन टप्प्यात यंदाची जनगणना पार पडणार आहे. या प्रक्रियेसाठी २ लाख ६४ हजार पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. स्व-गणना पूर्ण झाल्यावर एस इ आयडी दिला जाणार आहे. स्व-गणना ही बंधनकारक नसून ती ऐच्छिक आहे. १६ मे १४ जून या कालावधीत



अधिकारी घराघरात जावून पडताळणी करणार असून संकलित केलेले सर्व माहिती ही गोपनीय ठेवली जाणार आहे. सपूर्ण आणि अचूक माहिती अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन निरुपमा डांगे यांनी केले आहे.

**जनगणना कार्य संचालनालय नेमकं काय म्हणाले?**

"देशात प्रथमच जनगणनाची माहिती डिजीटल माध्यमातून घेतली जाणार आहे. स्व-गणना ही 1 मे ते 15 मे या पंधरा दिवसांच्या कालावधीत लोकं करु शकतील. जर कुणी स्व-गणना केली नसेल तरी काळजी करण्याची आवश्यकता नाही. माहिती गोळी करण्यासाठी घरोघरी 16 मे 14 जून या काळात जनगणना करणारे अधिकारी राज्यातील प्रत्येक घरास भेट देतील", अशी माहिती जनगणना कार्य संचालनालयच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी दिली.

जनगणना 2027 साठी राज्यातील सर्व जिल्हे/तालुके/शहरे/गावे यांच्या प्रशासकीय सीमा 1 जानेवारी 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीसाठी प्रशासकीय सीमा गोठवण्यात आल्या आहेत, म्हणजेच त्यात कुठलेही बदल करता येणार नाहीत. महाराष्ट्र शासनाने या संदर्भातील राजपत्र अधिसूचना



> जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या भविष्यातील विकासाच्या योजनांचा पाया आहे. सोलापूरच्या सर्व नागरिकांनी या आधुनिक सुविधेचा जास्तीत जास्त वापर करून एक जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे.
> **- डॉ. सचिन ओंम्बासे,**
> मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी

15 जुलै 2025 रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर 23 डिसेंबर 2025 रोजी राज्य शासनाने जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना प्रकाशित केली; याद्वारे क्षेत्रीय कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक राज्य/जिल्हा/वैधानिक शहर/तालुका स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा उभारण्यात आली.

राज्य शासनाने 16 फेब्रुवारी 2026 रोजी 33 प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह-यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

सोलापूर महानगर-पालिकेच्यावतीने या 'स्व-गणना' सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

१ मे ते १५ मे दरम्यान संधी आगामी जनगणनेसाठी ही स्व-गणनेची सुविधा १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत उपलब्ध राहणार आहे. नागरिकांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपला मोबाईल क्रमांक वापरून ओटीपी द्वारे लॉगिन करणे आवश्यक आहे. त्यानंतर नकाशावर आपल्या घराचे अचूक स्थान दर्शवून कौटुंबिक माहिती भरता येईल. संकेतस्थळावर अत्यंत साध्या आणि सोप्या प्रश्नांची उत्तरे देऊन ही प्रक्रिया पूर्ण करता येईल. माहिती भरून सबमिट केल्यानंतर नागरिकांना एक (युनिक क्रमांक) प्राप्त होईल. हा क्रमांक घरी येणाऱ्या संबंधित प्रगणक कर्मचाऱ्याला देणे अनिवार्य आहे. प्रगणकाची वाट पाहण्याची गरज नाही, घरबसल्या केव्हाही नोंदणी करता येईल. स्वतः माहिती भरल्यामुळे चुकीची माहिती नोंदवली जाण्याची शक्यता कमी होईल. नागरिकांनी दिलेली माहिती अत्यंत गोपनीय ठेवली जाणार असल्याचेही महापालिकेने सांगितले.

**मुख्याध्यापक आणि प्राचार्यांवर मोठी जबाबदारी**

सोलापूर महानगरपालिकेने शाळा, महाविद्यालये, शासकीय संस्था आणि स्वयंसेवी संस्थांना या राष्ट्रीय कार्यात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये जनजागृती करून त्यांना या सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



## संपादकीय

# फी वाढवणाऱ्या शाळांवर कठोर कारवाईचे धाडस सरकार दाखवेल का ?

आज समाजमाध्यमांच्या युगात एक वाक्य वारंवार कानावर पडते 'एखाद्या देशाची प्रगती रोखायची असेल, तर सर्वप्रथम त्याची शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करा; मग देश आपोआप अधोगतीकडे घसरतो.' हे वाक्य आज धक्कादायक वास्तव म्हणून आपल्यासमोर उभे आहे. सध्याच्या धोरणांमधून शिक्षण व्यवस्थेची जाणीवपूर्वक उपेक्षा होत असल्याची शंका नव्हे, तर ठोस जाणीव निर्माण झाली आहे.

सरकारी शाळा बंद करण्याचे प्रयत्न, चालू असलेल्या शाळांकडे केलेले उघड दुर्लक्ष, आणि परिणामी त्यांना अप्रासंगिक ठरवण्याची नीती या सगळ्यांनी खासगी शिक्षणासाठी दारं उघडी टाकली. त्याचाच परिणाम म्हणून मोठ्या शहरांपासून निमशहरी व ग्रामीण भागापर्यंत कॉर्पोरेट थाटाच्या, भपकेबाज इमारती उभारणाऱ्या खासगी शाळांचा अक्षरशः स्फोट झाला. या शाळांनी शिक्षणाला सेवा न मानता सरळ बाजारपेठेतील माल बनवले मनमानी फी, कुठल्याही कारणावरून आकारले जाणारे अतिरिक्त शुल्क आणि रोज नवे नियम लादण्याची बेफिकीरी. सर्वांत गंभीर बाब म्हणजे या सर्वांवर सरकारचे प्रभावी नियंत्रण जवळजवळ अदृश्यच झाले आहे–कारण हीच परिस्थिती काहींना सोयीची ठरत आहे, असा संशय अधिक गडद होत चालला आहे.

या चित्रात पालकही पूर्णपणे निर्दोष नाहीत; 'महाग म्हणजेच चांगले' या भ्रमाच्या किंवा 'स्टेटस'च्या आहारी गेलेली मानसिकता पाहून शिक्षणसंस्थांचे 'सम्राट' अधिकच बेधडक झाले आहेत. याचे ठळक आणि धक्कादायक उदाहरण म्हणजे अलीकडे पुण्यातील एका नामांकित खासगी शाळेने केलेली फीवाढ कागदोपत्री १५ टक्के वाढ सांगून प्रत्यक्षात ४५ ते ४७ टक्क्यांचा जबरदस्त बोजा पालकांवर टाकला गेला. जर दरवर्षी अशीच लूट सुरू राहणार असेल, तर सरकारचे नियंत्रण नेमके कुठे आहे, हा प्रश्न टाळता येत नाही. या घटनेने पुन्हा एकदा मूळ प्रश्न ऐरणीवर आणला आहे खासगी शाळांवर सरकारचे खरेच नियंत्रण आहे का ? आणि शिक्षणाच्या नावाखाली पालकांची सरळसरळ आर्थिक लूट सुरू आहे का ?

महाराष्ट्रात Maharashtra Educational Institutions (Regulation of Fee) Act, 2011 लागू आहे–कागदावर तरी हा कायदा अतिशय सक्षम आणि पालकांच्या हक्कांचा रक्षक म्हणून उभा दिसतो. या कायद्यानुसार प्रत्येक शाळेला फीवाढ करण्यासाठी पालक प्रतिनिधींची समिती अनिवार्य आहे; ठराविक टक्केवारीपेक्षा जास्त वाढ रोखणे आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे ही या समितीची जबाबदारी आहे. पण वास्तवात काय घडते? अनेक पालकांना या समितीच्या निर्णयप्रक्रियेत स्थानच दिले जात नाही. कागदोपत्री सर्व नियम पूर्ण झाल्याचा दिखावा केला जातो, पण प्रत्यक्षात पालकांचा आवाज पूर्णपणे दाबला जातो. आणि समजा एखाद्या पालकाने धाडस करून तक्रार नोंदवलीच, तर तिचा निकाल लागायला महिने नव्हे तर वर्षे उलटतात. म्हणजेच, कायदा आहे– पण त्याची अंमलबजावणी केवळ नावापुरती, निष्प्रभ आणि निष्क्रिय आहे.

याच परिस्थितीचा गैरफायदा घेत आज अनेक खासगी शाळा नॉन–प्रॉफिट असल्याचा आव आणतात; पण प्रत्यक्षात वार्षिक फी लाखोंमध्ये आकारली जाते, दरवर्षी ती वाढवली जाते आणि त्यावर वेगवेगळ्या नावांखाली अतिरिक्त शुल्कांची सरबत्ती चालते. हे सर्व पाहता शिक्षण हा सेवा क्षेत्राचा भाग राहिलेला नसून ते सरळ व्यवसायात रूपांतरित झाले आहे, अशी ठाम भावना पालकांमध्ये निर्माण झाली आहे. दुसरीकडे, पालकही तितकेच कोंडीत सापडले आहेत. सरकारी शाळांवरील कमी होत चाललेला विश्वास आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वोत्तम शिक्षणाची गरज या द्विधेत ते अडकले आहेत. पर्याय मर्यादित असल्यामुळे, फी अन्यायकारक असूनही अनेक पालक नाईलाजाने ती भरतात आणि विरोध केला तर मुलांच्या शिक्षणावर परिणाम होईल, या भीतीने ते आवाज उठवण्याचीही त्यांना भीती वाटते.

या संपूर्ण परिस्थितीत सरकारची भूमिका केवळ औपचारिक राहून चालणार नाही ती ठोस, निर्णायक आणि जबाबदार असली पाहिजे. केवळ कायदे बनवून हात झटकणे हा मार्ग आता परवडणारा नाही; त्या कायद्यांची कठोर आणि तडजोड न करणारी अंमलबजावणी हीच खरी कसोटी आहे. नियमित आणि पारदर्शक ऑडिट, फी संरचनेचा उघडपणे हिशेब, तक्रार निवारणासाठी वेगवान आणि प्रभावी यंत्रणा, आणि नियम धाब्यावर बसवणाऱ्या शाळांवर तात्काळ व कठोर कारवाई हे उपाय आता पर्याय नाहीत, तर अत्यावश्यक आहेत. इतकेच नव्हे, तर दोषी संस्थांवर दंडात्मक कारवाईसह मान्यता रद्द करण्यासारखे कठोर निर्णय घेण्याचीही तयारी सरकारने दाखवली पाहिजे; अन्यथा नियम केवळ कागदावरच राहतील. परंतु मूलभूत प्रश्न अजूनही ठाण मांडून उभा आहे– सरकार खरोखर अशी पावले उचलेल का? कारण वास्तव पाहिले, तर बहुतांश शिक्षण संस्था थेट किंवा अप्रत्यक्षपणे राजकीय छत्राखाली चालतात. अशा परिस्थितीत त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे धाडस सरकार दाखवेल का? हा केवळ संशय नाही, तर प्रत्येक पालकाच्या मनात घोंघावणारा रास्त प्रश्न आहे आणि याच 'संरक्षणा'मुळे या तथाकथित शिक्षण सम्राटांचे धाडस दिवसेंदिवस वाढत आहे; शिक्षणाला त्यांनी सरळ कोट्यवधींच्या उलाढालीचा, बिनधास्त नफा कमावणारा व्यवसाय बनवून टाकले आहे.

जर हीच ढिलाई आणि दुर्लक्ष कायम राहिले, तर शिक्षण हळूहळू सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाईल. गुणवत्तापूर्ण शिक्षण केवळ श्रीमंतांच्या मक्तेदारीत जाईल आणि समाजात आर्थिक दरी आणखी खोल होईल. मध्यमवर्गीय कुटुंबे आर्थिकदृष्ट्या कोलमडतील, तर वंचित घटक पूर्णपणे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाबाहेर फेकले जातील. शिक्षणाचा मूळ हेतू सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे हा केवळ घोषणांपुरता उरेल. आणि त्या दिवशी आपण केवळ शिक्षण व्यवस्थाच नव्हे, तर समतोल, न्याय्य आणि प्रगत समाजाची संकल्पनाही गमावलेली असेल. सर्वांत धक्कादायक म्हणजे त्या वेळी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे बळही समाजाने गमावलेले असेल; आणि सध्याचे चित्र पाहता, ही भीती आता वास्तवात उतरण्याच्या मार्गावर असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

नेपाळने एप्रिल २०२६ पर्यंत घेतलेली धाडसी भूमिका आपल्यासाठी आरशासारखी आहे. समानतेला केंद्रस्थानी ठेवत, सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मुलांना सार्वजनिक शाळांमध्येच शिक्षण घेणे अनिवार्य करण्याचा निर्णय हे केवळ धोरण नाही, तर व्यवस्थेला जबाबदार धरण्याचा स्पष्ट संदेश आहे. सार्वजनिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सत्ताधाऱ्यांनाच त्या व्यवस्थेत सहभागी करून घेणे, खासगी शाळांच्या मनमानी शुल्कावर लगाम आणणे, राष्ट्रीय ओळख जपणारे अभ्यासक्रम व नावांची सक्ती करणे आणि विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्यासाठी संरचनात्मक बदल करणे या सर्व उपाययोजनांतून नेपाळ एक समावेशक आणि समताधिष्ठित शिक्षण व्यवस्थेकडे ठाम पावले टाकताना दिसतो.

प्रश्न असा आहे की, भारतात विशेषतः महाराष्ट्रात अशी राजकीय इच्छाशक्ती का दिसत नाही? जेथे निर्णयकर्त्यांची मुलेच सरकारी शाळांपासून दूर राहतात, तेथे त्या शाळांचा दर्जा सुधारण्याची खरी प्रेरणा कशी निर्माण होणार? नेपाळचा हा प्रयोग परिपूर्ण आहे की नाही, यावर चर्चा होऊ शकते; पण 'सर्वांसाठी समान आणि परवडणारे शिक्षण' ही भूमिका मात्र स्पष्ट आणि ठाम आहे. म्हणूनच, आपल्या व्यवस्थेने आता कागदी आश्वासनांच्या पलीकडे जाऊन ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे. अन्यथा, शिक्षण क्षेत्रातील वाढती दरी, अनियंत्रित फीवाढ आणि पालकांवरील आर्थिक अन्याय हीच आपल्या भविष्यातील ओळख ठरेल. आणि त्या वेळी प्रश्न फक्त एवढाच उरेल आपण शिक्षण वाचवू शकलो नाही, की जाणूनबुजून ते बाजाराच्या स्वाधीन केले ?

# मूल्यांचा ऱ्हास की प्रगतिशील महाराष्ट्र ?

महान राष्ट्र ते महाराष्ट्र अशी साधीसरळ उत्पत्ती म.म. काणे यांनी केली आहे. महान पराक्रमी तो महापराक्रमी, महानपुरुष तो महापुरुष. तद्वतच महान राष्ट्र ते महाराष्ट्र. गेली दोन वर्षे जगावरती थैमान घातलेल्या, डोळ्याला न दिसणाऱ्या एका विषाणूमुळे महाराष्ट्र दिन आपण मोठ्या उत्साहात साजरा केला नाही. पण आता कोरोना चे संकट कमी झाल्यामुळे आपण साजरा करत आहोत. १ नोव्हेंबर १९५६ रोजी 'मुंबई' या नव्या राज्याची निर्मिती झाली होती. त्यानंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी राज्यभरात अनेक ठिकाणी निदर्शने झालीत. ८ मार्च १९६० रोजी द्वैभाषिकांचे विभाजन करणारे "मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक" मंजूर झाले. १७ मार्च रोजी मुंबई विधानसभेने आपल्या भावी राज्याचे नाव "महाराष्ट्र" ठेवले. त्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तसेच याच दिवशी देशाच्या पर्यायाने जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी १ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. भारतातील पहिला कामगार दिन मद्रास शहरात १९२३ ला झाला. लेबर किसान पार्टी हिंदुस्थान या संघटनेने हा दिवस पाळला. देशाच्या पर्यायाने जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी एक मे हा दिवस कामगार दिन म्हणून पाळला जातो.

छत्रपती शिवरायांसारखा प्रेरणादायी आदर्श राजा, संत आणि ग्रंथांचे संस्कार, निसर्गसौंदयार्ची मुक्त उधळण, खाद्यसंस्कृतीचं वैभव, संपत्ती निमीर्ती करणारे एक महत्त्वाचे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. या राज्याचा आर्थिक इतिहास नुसता कौतुकास्पद नाही तर अनुकरणीय आहे. महाराष्ट्रात मराठी संतांनी समाजमनाची जी काही शतके मशागत केली, त्यामुळे शिवाजी महाराजांसारख्या युगकर्त्या अलौकिक राज्यकर्त्याला त्याच्या विचारांना समजून स्वीकार करणारा समाज अनायासे मिळाला. म्हणजे शिवाजी महाराजांचा अवतार होईपर्यंत संतांनी आचार–विचार, स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व आदी गुणांचे पाठ तत्कालीन समाजाकडून गिरवून घेतले होते. त्यानंतर शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अनेक महामानवानी महाराष्ट्र घडवला. आज त्यांच्या विचारावरच महाराष्ट्र चालतोय. खरे तर या मातीत जन्मलेली संत परंपरा असो की येथील विचारवंतांनी पुरस्कृत केलेला तर्कवाद. भारतीय संगीताचे आश्रयस्थान असो की प्रगल्भ मराठी कवितेचा प्रांत असो. महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आणि ते टिकवलेही. असा हा आपला महाराष्ट्रा पण काल एक बातमी वाचली सलग तीन वर्ष भारतामध्ये महाराष्ट्र भ्रष्टाचारामध्ये प्रथम......

आज अधुनिक महाराष्ट्रात विचार, वैचारिक संघर्ष होताना दिसत नाहीत. होतात ते 'चक्का–जाम', 'रास्ता रोको' किंवा 'खळ्ळ खटयाक'! ही विकारवशता झाली आहे. तसेच वैयक्तिक ताशेरे, दोषारोप, धमार्चे राजकारण, जातीपातीचे राजकारण, भावनेचे राजकारण, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, स्त्रियांच्या बाबातीत गलिच्छ टिपण्या याचे प्रमाण वाढतच आहे. कोणीही राज्यकर्ते हे सत्ता टिकवण्यासाठी मतलबी व्यवहार करणार, हे उघड आहे. पण किती ? त्याला प्रमाण असावे. आपल्यामुळे राज्याचे नाव खराब होत आहे याची काळजी कोणीच करत नाही. राज्याच्या राजकारणातील जुनी पिढी ही प्रगल्भ होती. शाळा, रुग्णालये, रस्ते, पाणी असे सामान्यांशी निगडीत सामाजिक प्रश्न सोडविण्याकरीता त्यांची बांधिलकी होती. आता प्राधान्यक्रम बदलला आणि अवांतर विषयांना महत्त्व दिले जात आहे. डॉक्टर–वकील यांनी आपला समाजाचे नेतृत्व करण्याचा बाणा तर केव्हाच सोडून दिला आहे. आजचे विचारवंतही तटस्थ राहिले नाहीत, तेही मोहात गुरफटलेत. मंग समाजाला कोण तारणार? आज अवघ्या महाराष्ट्राला वैचारिकतेचे वावडे निर्माण झाले आहे आणि नीतिमत्ता, चारित्र्य, सदसद्विवेक यांचा छुपा किंवा क्वचित कोठे उघड तिरस्कार वाटू लागला आहे. महाराष्ट्रत चाललेले गलिच्छ व किळसवाने राजकारण पहता पोटाची खळगी भरणारे, कष्ट करून खाणारे, झोपेतून उठल्यापासून ते रात्र होईपर्यंत शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याला कोण काय म्हणाले, कोण जेलमध्ये गेले, कुठे ईडीची धाड पडली हे काय करायचे आहे. ब्रेकिंग न्युज आणि टी आर पी च्या या जीवघेण्या प्रसारयुगात बातम्यांची विश्वासार्हता, पुढाऱ्यांचे एकमेकांवरील आरोपांचे काही देणेघेणे नाही. ऐककाळ महाराष्ट्रातील राजकारणाचा आदर्श घेतला जात होता पण आज ? शेतकऱ्यांच्या, श्रमिकांच्या अगणित आत्महत्या ही तर महाराष्ट्राच्या भूतकाळाची काळी बाजू ती आजतागायत चालू आहेच व आता त्यात आंदोलनकर्त्या असंख्य तरूणांच्या आत्महत्याची भर पडली आहे. शिक्षणतज्ज्ञ, लेखकांनी, महिलांनी व्यसने व आत्मघात यावर भाष्य केले का ? आज मूल्यशिक्षण कमी झालेले दिसते. वाचन संस्कृतीचा अभाव हा तर सर्व साहित्यिक संस्था, परिषदा यांचा फार मोठा पराभव आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की, जेथे भ्रष्टाचार होत नाही. उलट आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. केवळ मोठ्या शहरांतूनच नव्हे, तर अगदी खेडोपाडीसुद्धा कामांच्या कागदांवर 'वजन' ठेवले नाही तर कामे होत नाहीत. पवलोपावली भ्रष्टाचार होताना दिसतो पण त्या विषयी कोणीही बोलत किंवा तक्रार करत नाही. अगदी बोटावर मोजण्याइतके प्रमाण तक्रारीचे आहेत. हे सर्व महाराष्ट्र आहे असे नाही. संपूर्ण देशात हेच आहे.

फक्त जय महाराष्ट्र म्हणून बदल होणार नाही तर कोणत्या गोष्टी महाराष्ट्राच्या विकासाच्या आड येतात त्या गोष्टीचा विचार करायला हवा. भ्रष्टाचार, गरिबी, मुलींवरचे अत्याचार या गोष्टींचा नायनाट केला पाहिजे. पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवली पाहिजे आणि प्रगतीची नवी शिखरे करण्याचा निर्धार केला पाहिजे. शेवटी मी एवढेच म्हणेन.........महाराष्ट्राची यशो गाथा, महाराष्ट्राची शौर्य कथा, पवित्र माती लावू कपाळी, धरणी मातेच्या चरणी माथा. सर्व महाराष्ट्रातील जनतेला महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा........

**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,**
अकलूज ९२२६१४४८३६
सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून ते शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# जय जय महाराष्ट्र माझा !

आजच्या महाराष्ट्र दिना दिवशी महाराष्ट्राचा जयजयकार करत असताना महाराष्ट्र राज्याची जडणघडण कशी झाली हे जाणून घेणे महत्वाचे आहे.....

महाराष्ट्र हा नररत्नाची खाण आहे. कर्मयोग्यांची कर्मभूमी आहे. साधू संतांची पुण्यभूमी आहे. येथे कृषी प्रवण आणि धर्माधिष्ठित अशी संस्कृती उदयास आली.महाराष्ट्र गीतामधून गीतकार राजा बढे महाराष्ट्राचे वर्णन येतोचितपणे करतात . विशेष करून गीताचे शेवटचे कडवे एखाद्या भारदस्त आवाजाच्या शाहिराच्या मुखातून ऐकत असताना प्रत्येक मराठी माणसाचे अंग शहरल्या शिवाय राहत नाही.....

काळ्या छातीवरी कोरली,
अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती,
खेळ जीव घेणी
दारीद्र्यांच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो,
महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा,
गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ॥॥

उधोतन सूरीने मराठी माणसाचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे–

' सुदृढ सावळे सहनशील
अन कलहप्रिय अभिमानी !
दिले घेतले बोलत लडती
मरहट्टे मैदानी !'

महाराष्ट्राचे भौगोलिक वैविध्य महाराष्ट्राचा संवेदन स्वभाव घडवण्यास कारणीभूत ठरले आहे. म्हणून मराठी माणसाचा स्वभावधर्म प्रा. वसंत बापट मांडताना लिहितात."………महाराष्ट्रीयन माणसाचे स्वभाव धर्म कोणी घडविलेच असेल,तर ते आधी भूगोलाने आणि नंतर इतिहासाने घडवलेला आहे. मराठा लढतो तो वैऱ्याचे उसने फेडण्यासाठी, स्वाभिमानाच्या रक्षणासाठी, स्वातंत्र्यासाठी,अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी, जीवनमूल्यांच्या जपणूकीसाठी, एरवी शांत मनाने आपली शेती भाती करत रहावे हाच त्याचा स्वभाव धर्म आहे."

महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास समजून घेतल्यास हा स्वभाव धर्म स्थानात येतो. महाराष्ट्र या नावाचा उल्लेख सातवाहनांच्या काळापासून सुरू झाला. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून महाराष्ट्र हे नाव प्रचलित झाले. महाराष्ट्रावर राज्य करणारे पहिले महाराष्ट्रीयन घराणे म्हणून इतिहासकार पैठणच्या सातवाहन राजाचा गौरव करतात. सातवाहन घराण्यातील पहिला सातकर्णी




हा अत्यंत पराक्रमी राजा होता. सातवाहनाच्या काळात संगीत, साहित्य, वास्तू कलांचा, महाराष्ट्रात विकास झाला. सातवाहनानंतर महाराष्ट्रावर राज्य करणारे 'त्रिकुटक' हे दुसरे घराणे होते. त्रिकुटक घराण्यामध्ये प्रदत्त, दहरसेन, व्याघ्रसेन हे पराक्रमी राजे होऊन गेले. इ.स. तिसरे शतक ते पाचव्या शतकाच्या काळात वाकाटक घराण्याची सत्ता महाराष्ट्रात होती. सातवाहनाच्या काळात सुरू झालेली कला, वाङमय आणि व्यापारातील भरभराट वाकाटकाच्या राजवटीत चालू राहिली.इ.स. सन आठव्या ते दहाव्या शतकात राष्ट्रकूट घराण्याने महाराष्ट्रात आपली सत्ता प्रस्थापित केली. वेरूळ येथील कैलास लेणी राष्ट्रकूटाच्या काळात पूर्ण झाली. इ.स. नववे ते तेराव्या शतकात शिलाहार घराण्यांनी महाराष्ट्र राज्य केले. महाराष्ट्र आणि कोकणात सापडलेल्या अनेक शिलालेखावरून शिलाहार घराण्याची माहिती मिळते. शिलाहारांच्या पाडावा नंतर संपूर्ण महाराष्ट्रात यादवांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यांची राजधानी सध्याचे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे होते. पाचव्या किल्लम राजाने ती दौलताबाद (देवगिरी) येथे आणली. याच काळात हेमाडपंथी मंदिरे बांधली गेली आहेत. पुढे देवगिरीवर खिलजी घराण्याचे साम्राज्य प्रस्थापित झाले. तुघलक व बहामनी राजवटीने काही काळ महाराष्ट्रावर राज्य केले. आदिलशाही निजामशाही आणि मोगलांच्या बाजूने अनेक मराठे सरदार आपापसात लढले; पण त्यांनी शौर्याची आणि पराक्रमाची एक परंपरा निर्माण केली.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह झिजवीती ऊपकारे। ' महाराष्ट्र ही संतांची पवित्र, पावन भूमी आहे. या भूमीत जन्म घेतलेल्या समाजाला संतांपासून संस्कारक्षम, शाश्वत मूल्यांचा खजिना मिळाला. त्यामुळे मराठी मनाचा कणा ताठ झाला.

ज्ञानदेव, नामदेव यांच्या काळात महाराष्ट्रात संत गोरोबा काका, सावता महाराज, चोखोबाराय, नरहरी महाराज, जनाबाई, मुक्ताबाई, निवृत्तीनाथ, सोपानकाका, सोयराबाई, विसोबा खेचर, परिसा भागवत इ. संत मंडळी होऊन गेली.

पुढे संत एकनाथ महाराजांनी संप्रदायाला भागवत ग्रंथ रुपी खांब दिला. संत तुकोबा या भागवत संप्रदायरूपी इमारतीचे कळस ठरले. ही परंपरा शब्दबद्ध करत असताना असे म्हटले जाते.....

संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे घातला पाया ।
उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर ।
तेणे केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ ।
खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस ।
भजन करा सावकाश ।।

या संतांनी महाराष्ट्राची भूमी वैचारिक आध्यात्मिक आणि नैतिक दृष्टीने सुपीक बनवली. पुढे याच सुपीक भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही आणि मोगल सम्राट यांच्याशी दीर्घकाळ लष्करी संघर्ष करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभी केली. धार्मिक उदारमतवाद, चोख न्यायव्यवस्था, व्यापार वाढ आणि शौर्य वृत्तीला प्रोत्साहन देणारा असा हा राजा न भूतो न भविष्यती पुन्हा होणे नाही....

पुढे पेशवाईच्या काळात मराठी सत्तेचा उत्कर्ष घडून आला.१७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचे फार मोठे नुकसान झाले.१८१८ साधी पेशवाईचा अस्त झाला आणि भारत देशासह महाराष्ट्र इंग्रजांच्या पारतंत्र्यात गेला.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीवर स्वातंत्र्य विषयक चळवळीचा व प्रबोधन चळवळीचा फार मोठा प्रभाव पडला आहे. स्वातंत्र्य चळवळीत उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके ,चाफेकर बंधू यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. पुढील काळात लो.टिळक यांनी जहाल विचारांनी तर ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी मवाळ विचारांनी स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले. ब्रिटिश सरकार नाकारून स्थानिक पातळीवर लोकांनी आपले प्रतिसरकार स्थापन करून राज्य करायचे, ही कल्पना क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्ह्यात 'पत्री–सरकार' स्थापन करून प्रत्यक्षात आणली. 'भित्र्यांच्या अहिंसेपेक्षा शूरांची हिंसा चांगली', असे उद्गार म. गांधी यांनी नाना पाटील यांच्याशी बोलताना काढले होते.

म. फुले यांनी 'धर्मराज्य भेद मानवा नसावे! सत्याने वातार्वे ईशासाठी !! असे म्हणत महाराष्ट्रात प्रबोधन चळवळीचा पाया घातला. समाज, धर्म, संस्कृती, राजकारण या जीवन क्षेत्रांची बुद्धीवादी चिकित्सा गोपाळ गणेश आगरकर यांनी केली. लोकहितवादी, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीत आपले बहुमूल्य योगदान दिले. महाराष्ट्रात समतावादी विचार कृतीत आणण्याचे काम राजर्षी शाहू महाराज यांनी केले. समता,स्वातंत्र्य,बंधुता व सामाजिक न्याय ही तत्वे रुजवण्यात व वाढवण्यात सतत संघर्षरत राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारत देशाच्या जडणघडणीत आपले योगदान दिले.

आजच्या दिवशी १मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १०५ हुतात्म्यानी आपले बलिदान दिले. सेनापती बापट, एस. एम. जोशी, प्र. के. अत्रे, श्रीपाद डांगे, प्रबोधनाकार ठाकरे या नेते गणांनी ही चळवळ आपल्या तळहातावर घेतली होती. त्यांच्याबरोबरच कसलीही अपेक्षा न करता लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर या त्रिकुटांनी ही चळवळ लोकगीतांच्या माध्यमातून धगधगत ठेवली होती.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या अशा ज्ञात–अज्ञात मराठी जणांचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. जय महाराष्ट्र !



**–किशोर जाधव,** सोलापूर
मो.नं.९९२२८८२५४१

# सोलापूरच्या १५ पोलिस अधिकारी–अंमलदारांना महासंचालकांचे सन्मानचिन्ह!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र दिनानिमित्त पोलिस सेवेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी व अंमलदारांना दरवर्षी राज्याच्या पोलिस महासंचालकांकडून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविले जाते.

यंदा सोलापूर शहर पोलिस दल, ग्रामीण पोलिस, पोलिस प्रशिक्षण केंद्र व राज्य राखीव पोलिस बलातील तब्बल १५ अधिकारी व अंमलदारांना हे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र मिळणार आहे.

राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या राज्यातील ८०० अधिकारी व अंमलदारांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहीर केले आहे. (शुक्रवारी) १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त सोलापूर शहर पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री जयकुमार यांच्या हस्ते या सर्व पोलिस अधिकारी व अंमलदारांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे.

दरम्यान, पोलिस सेवेत दाखल झाल्यानंतर १० वर्षे उत्कृष्ट कामगिरी करणारे व जनसेवा करताना ज्यांना १०० पेक्षा जास्त बक्षिसे मिळालेली असतात, त्यांना पोलिस महासंचालकांकडून महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र दिले जाते. ज्यांची कोणत्याही प्रकारची



चौकशी सुरु नाही, शिक्षा झालेली नाही, असे हे सगळे अधिकारी–अंमलदार असतात.

**'या' अधिकारी–अंमलदारांचा होणार सन्मान**

२०२५ या वषासाठी शहर पोलिसांकडील पोलिस निरीक्षक वैष्णवी पाटील, सहायक पोलिस निरीक्षक भारत चंदनशिव, जीवन निरगुडे, प्रविणकुमार हत्ते, ईरय्या स्वामी, पोलिस उपनिरीक्षक नागेश येणपे यांच्यासह अंमलदार दिपक जाधव, नितीन बागल, ज्योती यजमाने, महेश रोकडे यांना पोलिस महासंचालकांचे पदक जाहीर झाले आहे. तर सोलापूर ग्रामीण पोलिसांमधील सहायक पोलिस निरीक्षक मंजुळा धोत्रे यांनाही हे पदक मिळाले आहे. महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र मिळविणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. दुसरीकडे केगाव पोलिस प्रशिक्षण केंद्रातील पोलिस निरीक्षक संजय बोंबले, अंमलदार चंद्रकांत कुबसंगे, राज्य राखीव पोलिस बल क्र. दहा येथील सहायक पोलिस निरीक्षक नागेंद्र कट्टीमनी, यल्लप्पा कोळी यांनाही पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहीर झाले आहे.

# पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदी प्रवीण तनपुरे यांची निवड



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) माध्यमातून घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक (PSI) परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रवीण उत्तेश्वर तनपुरे यांची निवड झाली आहे.या यशाबद्दल त्यांच्या कुटुंबीयांसह सर्व मित्रमंडळी आणि नातेवाईकांकडून मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. सामान्य कुटुंबातील प्रविण तनपुरे जिद्द आणी चिकाटीच्या जोरावर सन २०१४ पोलिस भरती झाला. नवी मुंबई येथे क्राईम ब्रांचला पदावर काम असताना मेहनत घेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) ची परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक (PSI) निवड झाली आहे.त्याचा यशस्वी वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## वात्रटिका

### गर्जा महाराष्ट्र माझा

कष्ट सोसतो, घाम गाळतो
तरी कणखर महाराष्ट्र माझा...
अभिमानाने उर भरतो आणि
स्वाभिमानी सूर महाराष्ट्र माझा...
जीवाचे रान, राष्ट्राचे ध्यान
आत्मसन्मान महाराष्ट्र माझा...
इथे जन्मलो, भाग्य उजळले
गर्जा जय जय महाराष्ट्र माझा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोमनाथ भोसले यांची रिपब्लिकन सेनेच्या राज्य सचिवपदी नियुक्ती



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पीपल्स रिपब्लिकन पार्टी (PRP) ला मोठा धक्का बसला असून, युवक प्रदेशाध्यक्ष सोमनाथ अरुण भोसले व जिल्हाध्यक्ष अमित कांबळे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत.

महिला आघाडी जिल्हाध्यक्ष आशाताई रिकीबे, युवक जिल्हाध्यक्ष विश्वजीत सरवदे, सोलापूर शहराध्यक्ष शरणु हजारे, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख मेहबूब शेख, सोलापूर मीडिया प्रमुख सद्दाम पठाण, बारामती तालुकाध्यक्ष आनंद लोंढे, माळशिरस तालुकाध्यक्ष विश्वास उगाडे, तालुका कार्याध्यक्ष संतोष गायकवाड, युवक तालुकाध्यक्ष विकी लोंढे, तालुका सरचिटणीस दयानंद कांबळे, संपर्कप्रमुख राजू बागवान, अकलूज शहराध्यक्ष शिवाजी खडतरे, शहर उपाध्यक्ष साजिद बागवान, अकलूज शहर महिला आघाडी तालुकाध्यक्ष पुष्पाताई भडंगे तालुका संघटक अभिषेक पवार,तालुका प्रसिद्धी प्रमुख योगेश ढावरे,तालुका युवक प्रसिद्धी प्रमुख स्वप्नील उगाडे, तालुका सहप्रसिद्धीप्रमुख बॉबी उगाडे, तालुका युवक सरचिटणीस सतीश उगाडे,तालुका युवक सहसरचिटणीस प्रकाश उगाडे, तालुका कार्यकारणी सदस्य मारुती भोरे विजय मलमे,अकलूज शहर सरचिटणीस मन्सूर काझी,पंढरपूर तालुकाध्यक्ष सचिन जाधव,पंढरपूर तालुका संपर्कप्रमुख सावता नवगिरे,पंढरपूर तालुका सरचिटणीस गणेश गायकवाड, इंदापूर तालुका प्रभारी संतोष गायकवाड, इंदापूर तालुका संपर्कप्रमुख श्रीमंत नरुटे रवी कोळी अरुण कोळी अर्जुन कोळी सचिन चव्हाण मुनाफ कुरेशी आदेश थोरात अर्जुन जाधव सागर कोळी यांच्यासह अनेक पदाधिकारी व समर्थकांनी PRP चे राजीनामे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्याकडे पाठवले.

यानंतर सर्वांनी रिपब्लिकन सेना या पक्षात अधिकृत प्रवेश केला हा प्रवेश सोहळा राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर,अ‍ॅड.अमन आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष डॉ.सुशिल सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी सोमनाथ अरुण भोसले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांची रिपब्लिकन सेनेच्या फादर बॉडीच्या राज्य सचिवपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली.

नियुक्तीनंतर बोलताना भोसले म्हणाले, 'भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार आजपर्यंत काम केले आहे आणि पुढेही त्याच विचारांनी काम करत राहणार आहे.ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठे कर्तव्य आहे. समाजातील वंचितांच्या न्यायहक्कांसाठी मी पूर्ण ताकदीने काम करेन. सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात रिपब्लिकन सेनेची ताकद वाढवणे हेच माझे ध्येय असेल.' माझ्यासोबत आज राजीनामा दिलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या लवकरच नियुक्त्या करण्यात येतील या नियुक्तीनंतर समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून जल्लोष,घोषणाबाजी आणि अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.सोमनाथ भोसले यांचा हा नवा प्रवास सामाजिक परिवर्तनाला नवी दिशा देणारा ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# भीमा नदीकाठावरील वीजपुरवठा खंडित आदेश रद्द करून पाण्याचा प्रवाह वाढवावा - खा.प्रणिती शिंदे



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भीमा नदीकाठावरील शेतीपंपांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यासाठी देण्यात आलेला आदेश रद्द करून धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढवावा आणि वीजपुरवठा तात्काळ पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

उपअभियंता व जलसंपदा अधिकारी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्या माध्यमातून पंढरपूर, मंगळवेढा तसेच भीमा नदीकाठावरील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी उजनी धरणातून 28 एप्रिल 2026 पासून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे. हे पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी सोडण्यात आले असून त्याचा गैरवापर होऊ नये व शेतीपंपांद्वारे उपसा होऊ नये यासाठी नदीकाठावरील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

मात्र या निर्णयाचा थेट परिणाम शेती व्यवसायावर होत असून शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा बंद झाल्याने शेतीची कामे, पिकांची निगा आणि सिंचन व्यवस्थापन विस्कळीत झाले आहे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून वाडी-वस्त्यांवरील नागरिकांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे आणि धरणातून पाणी उशिरा सोडल्याने नदीकाठची पिके जळण्याच्या स्थितीत असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा खंडित करण्याचा आदेश तात्काळ रद्द करून वीज पूर्ववत सुरू करावी, तसेच धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा वेग वाढवून ते शेवटच्या टोकापर्यंत वेळेत पोहोचेल यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

आज खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना हे निवेदन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सादर केले. यावेळी मंगळवेढा तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रशांत साळे, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजेश पवार, उत्तर काँग्रेस तालुकाध्यक्ष भारत जाधव, दक्षिण काँग्रेस तालुकाध्यक्ष भीमाशंकर जमादार उपस्थित होते.

दरम्यान, मोतीलाल चव्हाण, सुदर्शन आवताडे, रमेश हसापुरे आदी पदाधिकारीही यावेळी उपस्थित होते.

# पाच उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात करमाळा, पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी व टेंभुर्णी अशा पाच ठिकाणी उपजिल्हा तर, अनगरमध्ये नवीन ग्रामीण रुग्णालय मंजूर असून त्याचे बांधकामही सुरू झाले आहे.

नव्याने 550 तर अनगरच्या ग्रामीण रूग्णालयात 30 असे एकूण 580 खाटांची वैद्यकीय सेवा नागरिकांना मिळण्यास मदत होईल. या माध्यमातून सामान्य नागरिकांना उच्च दजार्ची वैद्यकीय सेवा मिळणार आहे.

शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत करमाळा, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट, टेंभुर्णी (ता. माढा) येथील नागरिकांना जवळच्या ठिकाणी वैद्यकीय सेवा मिळावी, म्हणून नव्याने उपजिल्हा रुग्णालय मंजूर झाले असून बांधकामही सुरू आहे. करमाळा, बार्शी आणि टेंभुर्णी येथील बांधकाम निम्म्याहून अधिक झाले असून अन्य ठिकाणची कामे देखील सुरू आहेत. हे उपजिल्हा रुग्णालय सुरू झाल्यास वैद्यकीय सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. पंढरपूर व अक्कलकोटमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने भाविकांच्या आरोग्याच्या प्रश्न उदभवल्यास मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याची सोय होईल. पंढरपुरात 200 खाटांचे श्रेणीवर्धन रुग्णालय उभारले जात आहे. यापूर्वी 100 खाटांच्या माध्यमातून आरोग्य सेवा येथे दिली जाते. तसेच बार्शी आणि अक्कलकोट येथील रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करूनच 30 खाटावरून 100 खाटांचे रुग्णालय उभारले जात आहे. पाचही आरोग्य संस्था पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर गावापासून जवळच शासकीय आरोग्य संस्थेत मोफत उपचार मिळणार असल्याने यापुढील काळात येथील शासकीय रूग्णालयावरील रूग्णांचा ताण कमी होणार आहे.

– डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर पाचही आरोग्य संस्थेचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यातील बाह्यरुग्ण विभागाशिवाय व आंतररुग्ण विभागातील 580 खाटांच्या माध्यमातून वैद्यकीय उपचाराची सुविधा पूर्णपणे मोफत मिळेल. तसेच किरकोळ शस्त्रक्रियादेखील याच ठिकाणी होतील

# प्लॉस्टीकचा राष्ट्र ध्वज निर्मितीस व वापरास मनाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या मृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशांनुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॉस्टीकच्या वापरास, प्लॉस्टीकचा राष्ट्र ध्वज निर्मितीस व वापरास मान्यता नाही. राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकुन देऊ नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे ते बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम 1950 व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम 1971 तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय आहे. यास्तव कोणतेही खराब ध्वज आढळुन आल्यास ते सन्मानपुर्वक गोळा करून नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 67 वा वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन ध्वजसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

# युद्धामुळे महापालिकेच्या कामांवर परिणाम; ठेकेदारांचा कामबंदचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे बांधकाम साहित्यांच्या दरात मोठी वाढ झाली असून त्याचा परिणाम सोलापूर महापालिकेच्या विकासकामांवर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डांबर, सिमेंट आणि इंधन दरवाढीमुळे कामे करणे कठीण झाल्याचे सांगत ठेकेदारांनी दरवाढीची मागणी केली आहे.

सोलापूर महापालिका ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष आर. के. दुधाळ यांनी सोमवारी पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह महापालिका आयुक्तांना निवेदन दिले. बाजारभावानुसार दर न दिल्यास कामे बंद करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

शहरात सध्या विविध विकास योजनांतर्गत डांबरी व काँक्रीट रस्ते तसेच इतर बांधकामाची कामे सुरू आहेत. मात्र, आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे डांबराचा तुटवडा निर्माण झाला असून त्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय सिमेंट व डिझेल दरही सातत्याने वाढत असल्याने कामांचा खर्च प्रचंड वाढला आहे.

ठेकेदारांच्या मते, सध्याच्या जुन्या दरात कामे करणे आर्थिकदृष्ट्या अशक्य झाले आहे. त्यामुळे डांबर, सिमेंट आणि पेट्रोलियम पदार्थांच्या सध्याच्या बाजारभावानुसार नव्याने दरनिश्चिती (रेट अ‍ॅनालिसिस) करून वाढीव दर लागू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा कामे थांबवावी लागतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले असून विकासकामे सुरळीत ठेवण्यासाठी लवकर तोडगा निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### थकीत बिले तातडीने देण्याची मागणी

महापालिकेच्या विविध विकास, देखभाल व दुरुस्तीच्या कामांची बिले जानेवारीपासून प्रलंबित असल्याचा ठेकेदारांचा दावा आहे. ३१ मार्चअखेरपर्यंतची बिले अद्याप अदा करण्यात आलेली नसल्याने ठेकेदारांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. ही थकीत बिले तातडीने न दिल्यास १ मेपासून सर्व कामे बंद ठेवावी लागतील, असा इशारा संघटनेने दिला आहे.

# पंढरपूर तालुक्यात 1 मे पासून जनगणना

## नागरिकांनी सक्रीय सहभाग नोंदवण्याचे आवाहन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुक्यात दि.01 मे, 2026 पासून डिजीटल जनगणना मोहिमेला प्रारंभ होणार आहे. या टप्प्यात तालुक्यातील प्रत्येक घराची तसेच कुटुंबातील मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे केले आहे

जनगणनेचा पहिला टप्पा 01 मे, 2026 ते दि. 15 मे, 2026 या कालावधीत होणार असून, नागरिकांना स्वयंनोंदणीची सुविधा देण्यात आलेली आहे. नागरिकांनी https://se.census gov.in या संकेतस्थळावर जाऊन 34 प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झालेनंतर मिळणारा युनिक कोड पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे.

दुसऱ्या टप्प्यात दि. 16 मे 2026 ते दि. 14 जून, 2026 या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. स्वयंनोंदणी केलेल्या नागरिकांना केवळ युनिक कोड देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. या जनगणेत नागरिकांची वैयक्तीक माहिती, कुटूंब रचना, घरचा प्रकार, सदस्याची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा याचा तपशिल गोळा करणेत येणार असून सदरची माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी वापरली जाणार असून गोपनियतेची पूर्ण हमी देण्यात आली आहे. दरम्यान तालुकास्तरावर पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रशिक्षण सुरू आहेत. सदर जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करणेकरीता तालुक्यात 85 पर्यवेक्षक व 558 प्रगणकांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून शासनाच्या धोरणनिर्मितीची भक्कम पायाभरणी आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देत या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# आरटीईतून १,८८० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित; ७९३ जागा अद्याप रिक्त




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षणाचा हक्क (आरटीई) अंतर्गत जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून आतापर्यंत १,८८० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. मात्र अजूनही ७९३ जागा रिक्त असून, उर्वरित विद्यार्थ्यांनी पुढील दोन दिवसांत प्रवेश पूर्ण करावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. जिल्ह्यातील २८६ खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी एकूण २,६७३ जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी १,८८० जागांवर प्रवेश पूर्ण झाला आहे. यंदा एकूण २,६७३ विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले होते. त्यापैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून सहा विद्यार्थी अपात्र ठरले आहेत. त्यांच्या जागी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार आहे.

आरटीई अंतर्गत खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी दिली जाते. अंतिम मुदत जवळ आल्याने शाळा आणि शिक्षण विभागाकडून उर्वरित जागा भरण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**तालुकानिहाय प्रवेश आकडेवारी**

- अक्कलकोट - ८५
- बार्शी - ३०१
- करमाळा - १२६
- माढा - २६४
- माळशिरस - २२२
- मंगळवेढा - ६७
- मोहोळ - ९१
- पंढरपूर - २१०
- सांगोला - १२७
- उत्तर सोलापूर - ३२
- दक्षिण सोलापूर - १०७
- सोलापूर शहर - २४८
- एकूण - १,८८० प्रवेश

आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी केले आहे.

# सिंहगडच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक कामगिरी

## सोलापूर रेल्वे स्थानकावर जल्लोषात स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे दि. २४ ते २८ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या साउथ एशियन गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाने अभूतपूर्व कामगिरी करत चारही गटांमध्ये विजेतेपद पटकावत सर्वांगीण वर्चस्व सिद्ध केले. विशेष म्हणजे या विजयी संघात सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, केगाव, सोलापूर येथील तब्बल ८ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

स्पर्धेसाठी भारतीय संघ चेन्नई येथून विमानाने श्रीलंकेला रवाना झाला होता. स्पर्धा जिंकून परतताना संघ चेन्नई मार्गे रेल्वेने सोलापूरला दाखल झाला. स्पधेर्तील सब-ज्युनियर बॉईज, सब-ज्युनियर गर्ल्स, यूथ बॉईज आणि यूथ गर्ल्स या सर्व गटांमध्ये भारताने अपराजित कामगिरी करत सुवर्णपदकांची लयलूट केली. प्रत्येक गटात भारताने लीग फेरीपासून अंतिम सामन्यापर्यंत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत शानदार विजय नोंदवले.

सब-ज्युनियर बॉईज गटात भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेवर २३-१८ असा विजय मिळवला, तर सब-ज्युनियर गर्ल्स गटात १९-१६ अशी मात केली. यूथ बॉईज गटात ३६-२७ आणि यूथ गर्ल्स गटात २३-१९ अशा विजयांसह भारताने सर्वच गटांमध्ये सुवर्णपदक पटकावत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. या स्पर्धेत सिंहगड संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार प्रदर्शन केले. सब-ज्युनियर गर्ल्स गटात कु. जानवी बुराडे, यूथ गर्ल्स गटात कु. श्रद्धा चव्हाण व कु. आर्या पाटणे, सब-ज्युनियर बॉईज गटात आदित्य गुंड, आशिष बनसोडे व समर्थ मगर, तसेच यूथ बॉईज गटात अथर्व गुर्रम व वरुण सरडा यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत देशाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

### सोलापूर रेल्वे स्थानकावर जल्लोषात स्वागत

विजय मिळवून सोलापूरमध्ये आगमन होताच सोलापूर रेल्वे स्थानक येथे या विजेत्या खेळाडूंचे उत्स्फूर्त आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले. स्वागतावेळी परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन करत सांगितले की, 'आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. क्रीडा क्षेत्रात सिंहगडचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.'

या यशामागे भारतीय संघाचे प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांच्या तांत्रिक प्रशिक्षण, शिस्तबद्ध सराव आणि मानसिक तयारीमुळे संघाने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

या ऐतिहासिक विजयामुळे सिंहगड पब्लिक स्कूल तसेच सोलापूर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले असून, विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

